# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – 411 018

## करआकारणी व करसंकलन विभाग

## जाहिर प्रकटन

## 'सन 2022-2023 - कर व करेत्तर बाबींचे दरपत्रक'

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 99 अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सभा ठराव क्रमांक 762 दिनांक 20/01/2022 व महापालिका ठराव क्रमांक 24 दिनांक 06/04/2022 नुसार सन 2022-2023 करिता महानगरपालिका क्षेत्राकरिता कर व करेत्तर बाबींचे दर खालीलप्रमाणे निश्चित केले आहेत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | सामान्य कर : मिळकतीवरील (जमिन व इमारत) | | | |
| | करयोग्यमूल्याचा टप्पा (स्लॅब) | | निवासी मिळकत | निवासेत्तर मिळकत |
| | रक्कम रुपये 1/- ते 12000/- | | 24% | 27% |
| | रक्कम रुपये 12001/- ते 30000/- | | 27% | 30% |
| | रक्कम रुपये 30001/- व त्यापुढील | | 35% | 37% |
| | उपरोक्त निवासी मिळकतींचे कराचे दरात साफसफाईकर - 5%, अग्निशामक कर - 2% व मनपा शिक्षण उपकर – 4% तसेच बिगरनिवासी मिळकतींचे कराचे दरात साफसफाई कर - 6%, अग्निशामक कर - 2% व मनपा शिक्षण उपकर - 5% यांचा समावेश आहे. | | | |
| 2 | विशेष साफसफाईकर | करयोग्य मूल्यावर | --- | 2% |
| | फक्त मॉल्स,लॉजिंग बोर्डिंग,मंगल कार्यालय,सभागृह,रुग्णालय,हॉटेल्स,कॅन्टीन्स,रेस्टॉरंट या स्वरुपाच्या मिळकतींस | | | |
| 3 | वृक्ष उपकर | करयोग्य मूल्यावर | 1% | 1% |
| 4 | मलप्रवाह सुविधा लाभकर | करयोग्य मूल्यावर | 5% | 5% |
| 5 | पाणीपुरवठा लाभकर | करयोग्य मूल्यावर | 4% | 5% |
| 6 | रस्ता कर | करयोग्य मूल्यावर | 2% | 3% |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | नाट्यगृहावरील कर (करमणूक कर) | | |
| | 1 | सिनेमा | |
| | | अ) 500 पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त बैठक व्यवस्था (सिट्स) असणा-या थिएटरला प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.250/- |
| | | ब) मराठी सिनेमा | करमाफी |
| | | क) वातानुकुलित थिएटर प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.350/- |
| | 2 | नाटक | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | 3 | सर्कस (कॉर्निव्हल टेंटस्) | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | 4 | तमाशा | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | 5 | संगीत जलसे/शास्त्रीय संगीत जलसे (थियटरमधील किंवा थियटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास) | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | 6 | कुस्त्या / मुष्टीयुध्द | प्रती खेळास रु.50/- |
| | 7 | वरील खेरीज इतर प्रत्येक प्रयोगास(जर वेगवेगळे खेळ नसतील तर अशा प्रत्येक दिवसास) | प्रती दिवस रु.100/- |

8 **शिक्षण उपकर व रोजगार हमी उपकर**

महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम 1962 मधील तरतूदीनुसार करयोग्यमूल्यावर खालील दराने महाराष्ट्र राज्य शासनाकरिता शिक्षण व रोजगार हमी उपकर वसूल केला जातो.

| करयोग्यमूल्य टप्पा | शिक्षण उपकराचा दर | | रोजगार हमी उपकराचा दर |
|---|---|---|---|
| | निवासी | बिगरनिवासी | (बिगरनिवासी) |
| रुपये 75 ते 150/- | 2% | 4% | 1.00% |
| रुपये 151 ते 299/- | 3% | 6% | 1.50% |
| रुपये 300 ते 2999/- | 4% | 8% | 2.00% |
| रुपये 3000 ते 5999/- | 5% | 10% | 2.50% |
| रुपये 6000 व त्यापुढील | 6% | 12% | 3.00% |

9 फ्लोअरेज कर : महाराष्ट्र [मोठया निवासी असलेल्या] इमारतीवरील कर [पुन्हा अधिनियम करणे] अधिनियम 1979 [फ्लोअरेज टॅक्स] अन्वये करयोग्यमूल्यावर 10% महाराष्ट्र राज्य शासनाकरिता वसूल केला जातो.

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | मिळकत हस्तांतरण फी – परिपत्रक क्र. कर/मुख्य/9 /कावि/ 98 /2022 ,दिनांक 01/04/2022 नुसार | | |
| 11 | थकबाकी नसलेचा दाखला फी | | 10/- रूपये प्रती दाखला |
| 12 | मिळकत उतारा | | 20/- रूपये प्रती उतारा |
| 13 | प्रशासकीय सेवा शुल्क | | 10/- रूपये प्रति बीलास |
| 14 | **सामान्यकर सवलत योजना : (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर + अग्निशामक कर +मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत)** | | |
| | 1 | स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे पत्नी यांचे स्वत: रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **50% रक्कम सूट** |
| | 2 | फक्त महिलांचे नावे असलेल्या, स्वत: रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सुट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **50% रक्कम सूट** |
| | 3 | 40% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर असणा-या मिळकतीस | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **50% रक्कम सूट** |
| | 4 | संपूर्ण मिळकतकराची रक्कम आगाऊ भरणा-यां करीता सामान्य करात सुट देणे | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>1. स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस - **10% रक्कम सूट**<br>2. बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक/ मोकळया जमिनी इ .मिळकतीस - **5% रक्कम सूट** |
| | 5 | **ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मिळकती:**<br>ग्रीहा : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी. पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटा पत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 3 Star Rating - **05% रक्कम सूट**<br>• 4 Star Rating - **08% रक्कम सूट**<br>• 5 Star Rating - **10% रक्कम सूट** |
| | | **स्वग्रीहा** : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी. पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटा पत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 1 Star Rating - **05% रक्कम सूट**<br>• 2 Star Rating - **08% रक्कम सूट**<br>• 3 Star Rating - **10% रक्कम सूट**<br>• 4 Star Rating - **12% रक्कम सूट**<br>• 5 Star Rating - **15% रक्कम सूट** |
| | 6 | संरक्षण दलातील शौर्य पदक धारक आणि माजी सैनिकांच्या विधवा तसेच अविवाहीत शहीद सैनिकांचे नामनिर्देशितांचे राहणाऱ्या त्याच प्रमाणे शहरात वास्तव्य करणाऱ्या माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट |
| | 7 | प्रामाणिकपणे दरवर्षी मिळकत कराचा भरणा करणा-या मिळकतधारकांना सामान्य करात 2% (दोन) जादा प्रोत्साहनपर सवलत योजना लागू करणेबाबत (3 वर्षाचे ब्लॉक नंतर चौथ्या वर्षी) - **सवलत योजना संपूर्ण वर्षासाठी** | मागील सलग 3 आर्थिक वर्षामध्ये 31 मार्चपूर्वी थकबाकीसह संपूर्ण मिळकत कराचा एक रक्कम भरणा करणा-या मिळकतधारकांना चौथ्या वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **2% रक्कम सूट** (अ.क्र. 1 ते 5 मधील पात्र सवलतीसह) |
| | 8 | माझी मिळकत माझी आकारणी योजना : स्वयंस्फुर्तीने मिळकत कराची आकारणी करणा-यांसाठी सवलत - **सवलत योजना संपूर्ण वर्षासाठी** | महापालिकेच्या संकेतस्थळावर मिळकत कराच्या नोंदणीसाठी अर्ज करणा-यांना मिळकतीची ज्या आर्थिक वर्षात कर आकारणी कायम होईल त्या आर्थिक वर्षाच्या चालू मागणीतील मिळकतकर बिलामध्ये सामान्य करामध्ये **5% फक्त पहिल्या वर्षाकरिता सूट** (अ.क्र. 1 ते 5 मधील पात्र सवलतीसह) |
| | 9 | वरील योजनेपैकी कोणत्याही फक्त एका योजनेचा लाभ मिळकतधारकास घेता येईल तसेच वरील योजनेचा सामान्यकरातील सवलतीचा लाभ घेणेकामी थकबाकीसह दोन्ही सहामाहीची संपूर्ण बिलाची रक्कम एक रक्कमी आगाऊ भरणेची मुदत (बिल मिळो अथवा न मिळो) | अ.क्र. 1 ते 5 मधील सवलत योजनांसाठी - **दिनांक 30 जून अखेर**<br>अ.क्र. 6 चे सवलत योजनेसाठी संपूर्ण वर्ष |
| | 10 | थकबाकीसह एक रक्कमी मिळकत कराचा भरणा ऑनलाईन पेमेंट गेट-वेद्वारे करणा-या मिळकतधारकास चालू आर्थिक वर्षाचे सामान्य करात सवलत | 1. दिनांक 01/04/2022 ते 30/06/2022 अखेर सर्वसाधारण करात 5%<br>2. दिनांक 01/07/2022 ते 31/03/2023 अखेर सर्वसाधारण करात 2% |

टीप: www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर मिळकतधारकांना मिळकत कराचे बिल ऑनलाईन पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

जाहिरात क्रमांक :

क्रमांक : कर/मुख्य/9/कावि/ 122 /2022

दिनांक : 28 /04/2022

अति. आयुक्त (२)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - 411 018.